# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:19.07.2025** **वार:शनिवार**

---

1. देशातल्या पहिल्या भारतीय सर्जनशीलता तंत्रज्ञान प्रशिक्षण संस्थेचं मुंबईत उद्घाटन
2. या संस्थेच्या माध्यमातून देशातल्या युवा पिढीला नव्या संधींची दारं खुली होतील; केंद्रिय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांचा विश्वास
3. राज्य विधीमंडळाचं पावसाळी अधिवेशन संस्थगित; हिवाळी अधिवेशन 8 डिसेंबरपासून नागपूरमध्ये आणि
4. राज्य परिचारिका संघटनेच्या राज्यव्यापी आंदोलनामुळे रुग्णसेवेवर परिणाम

**आयआयसीटी**

देशातल्या पहिल्या भारतीय सर्जनशीलता तंत्रज्ञान प्रशिक्षण संस्थेचं म्हणजेच आयआयसीटी चं उद्घाटन काल मुंबईत झालं. केंद्रिय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते राष्ट्रीय चित्रपट विकास महामंडळाच्या आवारात उभारलेल्या या संस्थेचं उद्घाटन करण्यात आलं. युवा पिढीला सक्षम करुन कलात्मक निर्मिती उद्योगात आधुनिकता आणण्याचा सरकारचा दृष्टीकोन आहे असं सांगून या संस्थेमुळे देशातल्या युवा पिढीसाठी संधींची नवी कवाडं खुली होतील असं अश्विनी वैष्णव यांनी सांगितलं. या संस्थेविषयी अधिक माहिती देताना ते म्हणाले.....

**बहुत कम समय में एक बड़ा अचीवमेंट हुआ है जो कि देश के भविष्य के लिए नौजवानों के लिए नए अपॉर्च्युनिटीज क्रिएट करने के लिए एक बहुत बड़ा उपक्रम है। आईआईटी इंडियन इंस्टीट्यूट ऑफ क्रिएटिव टेक्नोलॉजी टेक्नोलॉजी आज के क्रिएटिव वर्ल्ड में जिस तरह से एक इंटीग्रल पार्ट बन चुका है। उसमें बहुत जरूरी है कि हमारी क्रिएटिव इकोनॉमी में काम करने वाले जितने भी लोग हैं और जो इससे जुड़ना चाहते हैं, उन सबको हम नए स्किल्स दें। टेक्नोलॉजीज में ट्रेनिंग दें, नए टूल्स दें और दुनिया में जो बेस्ट हो रहा है उसको हम अपने यहां पर भारत में लेकर आए और यहां से नए इन्क्यूबेशन, नए आइडियाज, नई टेक्नोलॉजीज भी भारत से बने।**

या संस्थेमुळे कलात्मक निर्मिती क्षेत्राला आवश्यक दिशा आणि संस्थात्मक पाठबळ मिळेल असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. यावेळी वेव्ज भारत दालनाचंही उद्घाटन वैष्णव आणि फडणवीस यांच्या हस्ते झालं. तसंच आयआयसीटीच्या बोधचिन्हाचं आणि वेव्ज परिषदेच्या फलिताची माहिती देणाऱ्या अहवालाचं प्रकाशन करण्यात आलं.

**विधीमंडळ कामकाज**

राज्य विधीमंडळाचं पावसाळी अधिवेशन काल संस्थगित झालं. या अधिवेसनात विधानसभेत एकंदर 134 तास कामकाज झालं. त्यात 15 विधेयकं संमत झाली. विधान परिषदेत 105 तास कामकाज झालं. विधीमंडळाचं हिवाळी अधिवेशन 8 डिसेंबरपासून नागपूरमधे होईल अशी घोषणा विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांनी केली. तत्पूर्वी विधानसभेत अंतिम आठवडा प्रस्तावाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उत्तर दिलं. राज्याच्या विकासासाठी आधुनिक पायाभूत सुविधा निर्माण करून शहरी आणि ग्रामीण विकास अधिक गतिमान केला जात आहे. तसंच गुन्हेगारीवर प्रभावी नियंत्रण मिळवण्यासाठी कायदा सुव्यवस्था अधिक बळकट करण्यात आली आहे, असं मुख्यमंत्री म्हणाले. मुंबईला महाराष्ट्रापासून कुणीही तोडू शकत नाही असं स्पष्ट करत मुंबईत मराठी माणसाचाच आवाज बुलंद राहील, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी दिली. जनसुरक्षा कायद्याबद्दलचा गैरसमज सर्वांनी डोक्यातून काढून टाकावा, हा कायदा केवळ माओवादी विचारसरणीच्या संघटना शोधून त्यांच्यावर बंदी घालण्यासाठी आहे, असं ते म्हणाले. विधिमंडळ परिसरात झालेल्या मारामारीच्या घटनेमुळे आपल्याला वेदना झाल्या असून, याबाबत चिंतन करायची गरज असल्याचं मत त्यांनी मांडलं. विधानसभेतील शिष्टाचाराबाबत बोलताना फडणवीस म्हणाले....

**विधानसभा आमदारांच्या मालकीची नाही. ही विधानसभा मंत्र्यांच्या मालकीची नाही. मुख्यमंत्र्यांच्या मालकीची नाही. इथल्या कर्मचाऱ्यांच्या मालकीची नाही. ही विधानसभा महाराष्ट्रातल्या चौदा कोटी लोकांच्या मालकीची विधानसभा आहे. आणि अशा या विधानसभेमध्ये समाजाला दिशा देण्याचं काम झालं पाहिजे, अशा प्रकारची अपेक्षा आहे आपल्याला एक त्रिसूत्री तरी या ठिकाणी ठरवावी लागेल. निवडून आल्यानंतर आणि ती म्हणजे संसदीय परंपरांचं पालन संसदीय भाषेचं पालन आणि सातत्यपूर्ण संवाद ही त्रिसूत्री जरी आपण पाळली तरी देखील मला असं वाटतं की या ठिकाणी निश्चितपणे आपण त्यातनं एक चांगला संदेश देऊ शकू.**

विधान परिषदेत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अंतिम आठवडा प्रस्तावाला उत्तर दिलं. राज्यात कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी तंत्रज्ञानाच्या सहाय्यानं अनेक उपाययोजना केल्या जात आहेत आणि त्यामुळे दोषसिद्धीचं प्रमाण वाढत आहे असं त्यांनी सांगितलं. कायदा सुव्यवस्था, सागरी सुरक्षा, आरोग्य अशा विविध विषयांवरच्या विरोधकांच्या प्रश्नांना त्यांनी उत्तरं दिली.

दरम्यान, विधान भवनात झालेल्या हाणामारीच्या घटनांना पायबंद घालण्यासाठी नीतीमूल्य समिती स्थापन करण्याची घोषणा विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी केली. एका आठवड्यात याचा निर्णय होईल असं त्यांनी सांगितलं. यापुढे अधिवेशन काळात विधीमंडळात सदस्य, स्वीय सहायक आणि अधिकाऱ्यांनाच प्रवेश दिला जाईल इतर कुणालाही प्रवेश देण्यात येणार नाही असं त्यांनी स्पष्ट केलं.

**विधिमंडळ-मुंबई**

सांगली जिल्ह्यातल्या इस्लामपूरचं नाव बदलून ईश्वरपूर करण्याची शिफारस केंद्र सरकारकडे करण्याचा प्रस्ताव काल विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहात मांडण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाचा साक्षीदार असलेला रायगड किल्ला ज्या निजामपूर ग्रामपंचायतीत येतो, तिचं नाव बदलून रायगडवाडी असं

करण्यात आल्याची घोषणा ग्रामविकास आणि पंचायती राज मंत्री जयकुमार गोरे यांनी काल विधानपरिषदेत केली.

**गणेशोत्सव**

शंभर वर्षाहून मोठी परंपरा असलेला राज्यातल्या गणेशोत्सवाला राज्य महोत्सवाचा दर्जा देण्यात आला आहे; हा महोत्सव राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचवण्यासाठी राज्यात गणेशोत्सवात होणाऱ्या विविध कार्यक्रमांची रुपरेषा सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड आशिष शेलार यांनी काल विधानसभेत जाहीर केली.

**गोविंदा विमा**

दहीहंडी खेळातल्या गोविंदांचा विमा उतरवला जाईल अशी घोषणा क्रीडा मंत्री दत्तात्रय भरणे यांनी केली. राज्यात दीड लाख गोविंदा आहेत या सर्वांचा विमा उतरवला जाईल असं भरणे यांनी विधानसभेत सांगितलं. अमित साटम यांनी हा मुद्दा उपस्थित केला होता.

**पत्रकार परिषद**

विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात विविध समाजघटकांसाठी महत्त्वपूर्ण तरतुदी केल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल सांगितलं. अधिवेशन संस्थगित झाल्यानंतर घेतलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. विरोधकांच्या प्रश्नाला समर्पक उत्तरं दिली, अंतिम आठवडा प्रस्तावातून राज्याची पुढची वाटचाल मांडली, असं सांगून त्यांनी कामकाजाबाबत समाधान व्यक्त केलं. जनसुरक्षा विधेयक हे लोकशाही पद्धतीने, विरोधी पक्षांच्या सदस्यांचं म्हणणं ऐकून घेऊन तयार केलं गेलं, याबाबतच्या समितीतल्या कुणीही असहमती दर्शवली नाही, मात्र विरोधकांनी नंतर दबाव आल्यामुळे सभागृहात वेगळी भूमिका घेतली, असा दावा मुख्यमंत्र्यांनी केला. या पत्रकार परिषदेला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार उपस्थित होते. विरोधकांनी जनतेचे प्रश्न मांडले नाहीत, फक्त पायऱ्यांवर सरकारचा निषेध केला अशी टीका एकनाथ शिंदे यांनी केली. हे अधिवेशन यंदाच्या पुरवणी मागण्यांच्या दृष्टीनं महत्त्वाचं होतं आणि दुसऱ्या आठवड्यात या मागण्या मंजूर झाल्या अशी माहिती अजित पवार यांनी दिली. ज्या विधेयकांवर चर्चा व्हायला हवी, ती झाली, एकही विधेयक गदारोळात संमत झालं नाही असं पवार म्हणाले.

**ठाकरे-मुंबई**

मुख्यमंत्र्यांचं भाषण ही स्वप्नरंजन गुटिका होती, या अधिवेशनात जनतेच्या अपेक्षांना न्याय मिळाला नाही अशी टीका माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी काल विधान भवनाच्या आवारात बातमीदारांशी बोलताना केली. लोकांच्या प्रश्नांना उत्तर मिळालं की नाही, त्यावर उपाययोजना केल्या की नाही, याचं उत्तर या अधिवेशनातून मिळालं नाही, असं ते म्हणाले. सत्ताधाऱ्यांना त्यांच्या चुका दाखवल्या तर ते आधीच्या सरकारकडे बोट दाखवतात, मात्र सरकार आपली जबाबदारी झटकू शकत नाही, असंही ते म्हणाले.

**वैद्यकीय सहाय्य-नांदेड**

मुख्यमंत्री सहाय्यता निधी आणि धर्मादाय रुग्णालय मदत कक्षातून यावर्षी नांदेड जिल्ह्यात पहिल्या सहा महिन्यांत 385 रुग्णांना 3 कोटी 31 लाखांची मदत देण्यात आली. जिल्हा स्तरावर मदत कक्ष उपलब्ध

झाल्यामुळे रुग्णांना मोठा दिलासा मिळत आहे, असं या कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांनी सांगितलं. दुर्धर आजारांवरील उपचारासाठी तसंच आपत्ती प्रसंगी मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाकडून आर्थिक सहाय्य देण्यात येतं. यासाठी नागरिकांना मंत्रालयात जावं लागत होतं मात्र आता जिल्ह्यांच्या ठिकाणी कक्ष स्थापन झाल्यामुळे नागरिकांची चांगली सोय झाली आहे.

**<u>आंदोलन</u>**

सातव्या वेतन आयोगातील वेतनत्रुटी आणि कंत्राटी भरतीच्या निषेधार्थ महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटनेनं राज्यव्यापी आंदोलन सुरू केलं आहे. मागण्या पूर्ण होईपर्यंत अनिश्चित काळासाठी हा संप सुरू राहणार असल्याचं संघटनेनं सांगितलं आहे. पुण्यातील ससून रुग्णालयासह राज्यातल्या अन्य रुग्णालयांमधल्या परिचारिका संपावर गेल्यामुळे रुग्णसेवेवर परिणाम झाला आहे.

**<u>हवामान</u>**

येत्या 24 तासात कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह जोरदार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. मराठवाड्यात तुरलक ठिकामी मेघगर्जना आणि विजांसह पाऊस पडेल तर विदर्भात काही पाऊस पडेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्राचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.**

**नमस्कार.**